स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ ,नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड , मानवविज्ञान विद्याशाखे अंतर्गत राज्यशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या शोधप्रबंधाचा संशोधन आराखडा.

विषय :- "महाराष्ट्र विधिमंडळातील मुस्लिम महिला नेतृत्वाचा अभ्यास :विशेष संदर्भ मराठवाडा (2002-2014)"

संशोधक विद्यार्थ्यांनी

शेख तबसुम मेहबूब औ

संशोधक मार्गदर्शक

प्रा. डॉ. आय. जी. खान

(राज्यशास्त्र विभाग प्रमुख)

श्री रेणुकादेवी महाविद्यालय, माहूर. जी. नांदेड.

" महाराष्ट्र विधिमंडळातील मुस्लिम महिला नेतृत्वाचा अभ्यास : विशेष संदर्भ मराठवाडा (2002-2014)"

प्रस्तावना (Introduction)

विकासाच्या वाटेवर पाऊल ठेवणारा भारत हा एक महान देश आहे. यामध्ये अनेक प्रकारच्या जाती धर्माचे लोक राहतात. जगातल्या महान संस्कृती पैकी एक प्राचीन संस्कृती भारतात आहे. भारतामध्ये अठरा प्रगाढ जाती असतानाही विविधतेत एकता आहे. प्राचीन काळापासून भारताने विविध धर्म पंथ व जातीच्या लोकांना आपल्यात सामावून घेतलं आहे. व सर्व धर्म येथे शांततामय जीवन यापण करत आहेत. भारताचा इतिहास हा अनेक साम्राज्यात विभागला गेला तरी इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी स्वातंत्र्यासाठी सर्व धर्मीयांनी एकजूट होऊन कार्य केले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भारताला वेगवेगळ्या समस्यांना आव्हान द्यावे लागले हलीची करोना समस्या असो, महामारी असो अशा विविध संकटातून भारत विकासाच्या दिशेकडे वाहत आहे.

स्वतंत्र्योत्तर काळात सर्व भारतीयांनी राज्यघटनेच्या आधारे भारताचा विकास करायचा या दिशेने ध्येय धोरणे आखली त्यांना यामध्ये अनेक आवाहनांना सामोरे जावे लागले. राजकीय व्यवस्था स्थापन करून त्यात जनतेचे अध्य मान्यता मिळवून देणे, विविध जाती धर्मात विभागलेल्या समाजाला एकसंघ करणे, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय प्रश्न सोडवून तत्सम धोरणे अमलात आणणे, समाजातील विखुरलेल्या स्तरातील लोकांना राष्ट्रप्रवाहात सामील करून विकासाच्या संधी उपलब्ध करून देणे. अशा खडतर परिस्थितीत राष्ट्राने आपली वाटचाल सुरू केली.

लोकशाहीमध्ये समाजाच्या विकासासाठी आणि उन्नतीसाठी प्रभावी नेतृत्व आवश्यक असते. समाज कोणत्याही जातीचा धर्माचा असो ,त्याचे प्रश्न ,समस्या ,मूलभूत गरजा सोडविण्यासाठी एक खंबीर परिपक्व नेतृत्व आणि सत्तेमध्ये सहभागीत्व आवश्यक मानले जाते. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, मुस्लिम लीग यासारख्या पक्षाद्वारे मुस्लिम नेतृत्वाने व मुस्लिम समाजाने भारतीय राजकारणात आपल्या सहभाग नोंदविला आहे मौलाना आझाद ,डॉक्टर झाकीर हुसेन ,खान अब्दुल गफार खान , बरुद्दिन तय्यबजी ,मौलाना हसरत मोहनी, मोहम्मद अली जिना यांच्यासारखे मुस्लिम नेतृत्व भारतीय राजकारणात सक्रिय होते. संख्यात्मक दृष्टिकोनातून हा सहभाग मर्यादित स्वरूपाचा होता. स्वतंत्र पूर्व काळात नवाब, जमीनदार, वरिष्ठ वर्गीय अश्रफ आणि मौलाना उलेमांच्या हाती मुस्लिम नेतृत्व सीमित होते, स्वातंत्र्योत्तर काळातही या परिस्थितीत फारसा फरक पडलेला दिसत नाही. भारतीय राज्यघटनेने मुस्लिम समाजाला सत्तेत सहभागी होण्याची संधी प्राप्त करून दिली होती, परंतु त्याचा उपयोग आणि फायदा मुस्लिम समाजाने घेतलेला दिसून येत नाही.

देशाच्या फाळणीनंतर अनेक राष्ट्रप्रेमी मुस्लिम नेतृत्व भारतातच स्थायिक झाले आणि भारतीय मुस्लिम समाजाला प्रगतीपथावर नेण्याचा प्रयत्न करत राहिले. तत्कालीन मुस्लिम नेतृत्व ध्येयवादी, धोरणात्मक व दूरदर्शी स्वरूपाचे होते . आर्थिक, शैक्षणिक, राजकीय आणि सामाजिक अडचणी सोडविल्याशिवाय मुस्लिम समाजाला प्रगती करता येणार नाही हे त्यांनी ओळखले होते .या सर्व नेत्यांनी मुस्लिम समाजाला राष्ट्रीय प्रवाहात आणण्यासाठी मुस्लिम समाजाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी प्रयत्न केले. स्वातंत्र्य भारताची राज्यघटना अस्तित्वात आली आणि मुस्लिमांना इंग्रजी सत्तेच्या काळात असणारे अनुसूचित जातीचे आरक्षण संपुष्टात आले. परिस्थिती व राजकीय समीकरणे बदलत गेली. सत्ता स्पर्धा वृद्धिंगंत झाली विविध राजकीय पक्षांनी सत्ताप्राप्तीसाठी जनतेचा विविध आधारावर " व्होट बँक " म्हणून विचार केला . काही अंशी काही राज्यात स्थानिक पातळीवर मुस्लिमांचा स्वतःचा पक्ष वगळता, राष्ट्रीय पातळीवर प्रबळ असा पक्ष नसल्यामुळे मुस्लिम नेतृत्व आपापल्या विचारसरणीनुसार विविध राजकीय पक्षात स्वस्तित्वासाठी सत्ता स्पर्धेत सामील झाले. " व्होट बँक " प्राथमिकता बनत गेली व विकासाचा विचार मागे पडत गेला.

फाळणीचा वाईट अनुभव, अल्पसंख्यांक असल्याची जाणीव, विकास कार्याचा अभाव, शिक्षणाचा अभाव, हालाखीची आर्थिक परिस्थिती, सुरक्षिततेचा प्रश्न इत्यादी प्रश्न मुस्लिम समाजाला मागास आणि अविकसित अशा समूहाच्या संकल्पनेत नेत आहेत. कोणत्याही समाजात समाजोत्थान आणि विकास यासाठी त्या समाजातील राजकीय नेतृत्व व लोकप्रतिनिधी अत्यंत मोलाची भूमिका बजावतो. समाजातील प्रत्येक घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी योग्य मार्गदर्शक असणे आवश्यक आहे. राजकीय नेतृत्व समाजाच्या अशा अपेक्षा समजून घेऊन त्यांना पूर्ण करण्यासाठी मदत करत असतो. समाजाच्या उज्वल भविष्यासाठी उत्तम नेतृत्व काळाची गरज बनली आहे.

बहुसंख्यांक आणि अल्पसंख्याक असे समाजात धर्माच्या आधारावर दोन गट पडल्यामुळे अल्पसंख्यांक समाजाला अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. भारतातील दुसऱ्या क्रमांकाचा अल्पसंख्यांक समाज म्हणजे मुस्लिम समाज होय. 2011 च्या जनगणनेनुसार भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी 14.2% मुस्लिम समाज आहे. तर महाराष्ट्रात मुस्लिम 11.54% आहेत. परंतु मुस्लिम समाजाने इतर समाजाच्या तुलनेत लक्षणीय प्रगती व समग्र विकास साधलेला दिसत नाही.

भारतीय राज्यघटने मार्फत अल्पसंख्याक समाजासाठी विविध कायदेशीर तरतुदी भारतीय संविधानाच्या भाग तीन मध्ये कलम 12 ते 35 मध्ये करण्यात आलेले आहेत. तसेच 1978 ला अल्पसंख्याक आयोग तयार करण्यात आला, 73 वी घटनादुरुस्ती व 74 वी घटनादुरुस्ती स्थानिक पातळीवर राजकीय सहभाग वाढविण्यासाठी मोलाच दगड ठरली. शहरात नगरपालिका व महानगरपालिका, ग्रामीण भागात पंचायत राज हे नवीन व्यासपीठ नवीन राजकीय नेतृत्व उदयास येण्यास फायदेशीर ठरत गेले. मुस्लिम बहुल मतदार संघातून राजकीय दृष्ट्या मुस्लिम नेतृत्वाला वाव मिळाला व नवीन व्यासपीठ मिळाले. याचा फायदा मुस्लिम नेतृत्वालाही झाला. त्यांच्यात राजकीय जाणिवा जागृत झाल्या परंतु स्थानिक राजकारणात मुस्लिम नेतृत्व प्रगतीपथावर दिसले नाही. काही अंशी मुस्लिम नेतृत्वाने या संधीचा लाभ घेऊन समाज विकासाची धुरा उचलली परंतु शासन प्रशासन यांची साथ त्यांना मिळालेली दिसत नाही. आर्थिक दृष्ट्या मागासलेपणा, निरक्षरता, पक्षीय राजकारण , दुजाभाव, पडदा पद्धती, वैयक्तिक मर्यादा व विकासापासून दूर अशा अनेक कारणामुळे मुस्लिम नेतृत्व समाजाच्या समस्या सोडवण्यातअसमर्थ ठरला आहे .

भारतातील राजकीय पक्षांनी मुस्लिम समाजाला प्रतिनिधित्व देताना दुय्यम स्थान दिले व मुस्लिम नेतृत्वाला पक्षीय राजकारणात वरचढ होऊ दिले नाही. बाबरी मज्जिद प्रकरण, शहाबानो प्रकरण, पोलिसांचा बेजबाबदारपणा, धार्मिक दंगली यासारख्या ज्वलंत प्रश्नातून मुस्लिम समाजाला व्यवस्थित मार्ग दाखवण्यात मुस्लिम नेतृत्व कमी पडताना दिसून येत. त्यातल्या त्यात मुस्लिम महिला नेतृत्वास राजकीय पक्षांनी जास्त संधी दिलेल्या दिसून येत नाहीत त्यांचा सहभाग नगण्य स्वरूपाचा आहे. मुस्लिम नेतृत्व व समाज यांच्यातील संवाद कमी होत चालला आहे. भावनिक आव्हान करून फक्त मते मिळविणे हा मुस्लिम नेतृत्वाचा उद्देश बनलेला बहुतांशी जाणवतो.

भारत हा विकासाच्या दिशेने जात आहे. जागतिकीकरण, मिश्र अर्थव्यवस्था, झपाट्याने बदलणारे युग यामुळे भारतीय मुस्लिम समाजात स्व-अवलोकनाची प्रक्रिया काही अंशी सुरू झाली. राजकीय सहभाग, आधुनिक तांत्रिक शिक्षण पद्धतीचा स्वीकार, मुस्लिम मुलींना शिक्षणाच्या सोयी सुविधा, समाजात राहून वेगवेगळे समाज उपयोगी कार्य, अंशिक प्रमाणात मुलींचा स्पर्धेत सहभाग, महिलांचा राजकारणात सहभाग असे अनेक प्राकृतिक कार्य सुरू झालेले दिसून येते. परंतु एकंदरीत भारतीय मुस्लिम समाज व त्यातील महिला इतर समाज घटकांच्या तुलनेत लक्षणीय विकास करताना दिसत नाहीत. मुस्लिम महिला राजकारणाकडे दुर्लक्ष करतात, राजकारणात सहभागी होण्याचा प्रयत्न करत नाहीत. भारतीय मुस्लिम समाजाची प्रभावी मुस्लिम लोकप्रतिनिधीच्या अभावाने जी दयनीय अवस्था झाली आहे. त्याचे विदारक चित्र रंगनाथ मिश्रा आयोग, महमूद-उर - रहमान आयोग अशा विविध आयोगाच्या अहवालावरून स्पष्ट होते.

विविध धर्मीयांनी मिळून नटलेला भारत देश त्यातील सर्वात मोठा अल्पसंख्यांक वर्ग म्हणजे मुस्लिम

समाज शोधनिबंध व बरेच लिखाण झाले आहे. परंतु भारतीय मुस्लिम महिला राजकारणापासून का वंचित आहेत, त्यांचे नेतृत्व स्थानिक स्वराज्यात का कमी आहे, त्यांचे कारण जाण्याने हा या संशोधनाचा उद्देश आहे. मुस्लिम महिला राजकीय नेतृत्व यावर लिखाण झालेले नसल्यामुळेव हा विषय दुर्गम राहिल्यामुळे या विषयाची जाणीवपूर्वक निवड करण्यात आली आहे. राजकीय नेतृत्व असलेल्या मुस्लिम महिलांचे प्रश्न जाणून घेणे व त्यांच्या समस्या काय आहेत यावर प्रकाश टाकने. त्यांच्या राजकीय कारकीर्द विषयी जाणून घेण्यासाठी प्रस्तुत शोधनिबंध निवडण्यात आला आहे .

संशोधनाची आवश्यकता (Need of the Research)

लोकशाहीत राजकीय सहभागाला अतिशय महत्त्व असते. राजकीय सामाजीकरण व राजकीय नेतृत्वाच्या माध्यमातून लोकशाही अधिक मजबूत बनते. भारतीय राजकारणात " राजकीय नेतृत्व" विद्यार्थ्यांच्या व संशोधकाच्या आकर्षणाचा विषय समजला जातो. आधुनिक काळात नेतृत्व विषयी वेगवेगळे निकष लावले जातात. भारतात विषमता मुलक समाज व्यवस्था नष्ट करून लोकशाही शासन व्यवस्था निर्माण करताना राष्ट्राची उभारणी स्वातंत्र्य, समता, व न्यायाच्या दृष्टीने करण्यात आली. भारतीय संविधानकारकांनी प्रस्तावनेत सामाजिक, आर्थिक, व राजकीय न्याय, विचार ,अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा, व उपासना यांची समानता उपलब्ध करून दिली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थेमुळे मुस्लिम समाजाला तसेच शहरी ग्रामीण भागातील लोकांना नेतृत्व करण्याची संधी प्राप्त होत आहे. यामुळे देश प्रगतीपथावर जाण्यास तयार होत आहे. स्थानिक स्वराज्य मुळे ग्रामीण शहरी विकासाची वाटचाल ही परिवर्तनाची दिशा ठरत आहे. भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेत मुस्लिम पुरुष काही प्रमाणात नेतृत्व करत आहेत. परंतु मुस्लिम महिला या क्वचित आहेत. मुस्लिम महिला लोकप्रतिनिधींच्या भूमिकेचे मूल्यांकन आवश्यक ठरते. या दृष्टीने संशोधकाला यावर संशोधन करणे आवश्यक वाटले .

राजकीय अभिजनामध्ये मुस्लिम समाजाला मिळालेल्या संधीच्या प्रथिनिधित्वामुळे हा बदल घडवून हा राजकीय विचार प्रवाह निर्माण होऊ लागला. त्यामुळे मुस्लिम समाजातील महिला राजकीय नेतृत्व हा अध्ययनाचा विषय प्रस्तुत अभ्यासात एक राज्यशास्त्राची अभ्यासक व संशोधक म्हणून राजकीय नेतृत्व राज्य विधिमंडळातील राजकारणात महत्त्वाचा आहे या हेतूनेच या शीर्षकांतर्गत प्रस्तुत विषय संशोधनासाठी घेण्यात आला आहे.

प्रस्तुत अध्ययन "महाराष्ट्र विधिमंडळातील मुस्लिम महिला राजकीय नेतृत्वाचा अभ्यास : (विशेष संदर्भ मराठवाडा)" या क्षेत्रात कार्य करणाऱ्या महिलांचे मूल्यांकन ,मुस्लिम राजकीय नेतृत्वाचा समाज विकासासाठी प्रयत्न, मुस्लिम महिला राजकीय नेतृत्व आणि मुस्लिम समाज यांच्यातील अंतरक्रिया तसेच विविध राजकीय पक्षाची मुस्लिम नेतृत्व प्रति भूमिका, मुस्लिम महिलांचा राजकारणाप्रति दृष्टीकोनाच्या अभ्यासासाठी हा विषय निवडला आहे.

मुस्लिम महिला नेतृत्वाने समाजातील विविध प्रश्न सोडवण्यासाठी कोणते प्रयत्न केले? मतदारसंघात विकासात्मक कामे केले का? त्यांचे नेतृत्व कसे व कोणत्या परिस्थितीत विकसित होत गेले. या सारख्या अनेक कारणाचा शोध घेण्यासाठी "महाराष्ट्र विधिमंडळातील मुस्लिम महिला नेतृत्वाचा अभ्यास : (विशेष संदर्भ मराठवाडा)" यांच्या राजकीय नेतृत्वावर संशोधन घेणे आवश्यक आहे म्हणून हा विषय अभ्यासासाठी निवडण्याचे ठरविले आहे.इसवी सन 2002ते 2014 पर्यंतचा कालखंड निश्चित केला आहे.

संशोधन समस्या/ समस्या सूत्रण (Formulation of the Problem)

प्रस्तुत संशोधनासाठी "महाराष्ट्रातील विधिमंडळातील मुस्लिम महिला नेतृत्वाचा अभ्यास : (विशेष संदर्भ मराठवाडा)"कालखंड 2002 ते 2022 हा विषय घेतलेला आहे.

1) मुस्लिम महिला राजकीय नेतृत्वाच्या जडणघडणीत राजकीय वारसा होता का ?
2) मराठवाड्यातील मुस्लिम महिलांचे नेतृत्व पुढे येण्यास ,आर्थिक , शैक्षणिक व सामाजिक परिस्थिती जबाबदार आहे का ?
3) मुस्लिम समाजाचा विचार व विकासामागील प्रेरणा ओळखणे.
4) मुस्लिम समाजाच्या मागासलेपणासही राजकीय सहभाग कमी आहे का ? याचा शोध घेणे.
5) महाराष्ट्र विधिमंडळात मराठवाड्यातील मुस्लिम महिला नेतृत्वाने राजकीय कार्य कशा प्रकारे पार पाडले आहेत याचा शोध घेणे ?
6) मुस्लिम महिला लोकप्रतिनिधी विधिमंडळात येतात त्यांचा समाजाशी पुरेसा संवाद आहे का ? व तो कशा प्रकारे आहे याचा अभ्यास करणे.
7) निर्वाचन प्रक्रियेत मुस्लिम महिला नेतृत्वाची भूमिका आणि स्थिती कशी आहे, याचा शोध घेणे.
8) मुस्लिम महिलांचे राजकारणातील सहभागाचे प्रमाण कमी का आहे ?
9) मुस्लिम महिला नेतृत्वाकडे बघण्याचा दृष्टिकोन मुस्लिम समाजाचा कसा आहे ?
10) मुस्लिम समाजाचा एक घटक या नात्याने मुस्लिम समाजातील महिलांच्या लोकप्रतिनिधी कडून काय अपेक्षा आहेत.
11) मुस्लिम महिलांच्या राजकीय सहभागाची स्थिती तसेच त्यांच्या राजकीय नेतृत्वाची जडणघडण कशी झाली.
12) मुस्लिम लोकप्रतिनिधींना मुस्लिम समाजातील महिला विकासासाठी मुस्लिम समाज सहकार्य करते का ?

इत्यादी बाबीवर प्रकाश टाकण्यासाठी हा विषय अभ्यासासाठी निवडला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे (Objective of the Research)

प्रस्तुत संशोधन अध्ययनासाठी खालील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहे.

1) मुस्लिम समाजाची ऐतिहासिक पार्श्वभूमी अभ्यासणे.
2) महाराष्ट्र विधिमंडळातील मुस्लिम महिला नेतृत्वाची राजकीय शैली जाणून घेणे.
3) मुस्लिम महिला नेतृत्वाच्या विकासाचे योगदान अभ्यासणे.
4) महाराष्ट्र विधिमंडळातील मराठवाड्यातील मुस्लिम महिला नेतृत्वाचा अभ्यास करणे.

5) मुस्लिम महिला नेतृत्व असणे किती आवश्यक आहे व ती काळाची गरज कसे ठरत आहे हे जाणून घेणे.

6) भारतीय राज्यघटनेतील आरक्षणाची तरतूद अभ्यासणे.

गृहीतकृत्ये (Haypothesis)

प्रस्तुत संशोधन विषयासंबंधी पूर्व अनुमानाच्या आधारावर काही गृहीतके निश्चित केली आहेत ती खालील प्रमाणे आहेत.

1) पडदा पद्धतीमुळे मुस्लिम महिलांचा राजकारणात सहभाग कमी आहे.

2) विविध राजकीय पक्षांचा मुस्लिम अल्पसंख्यांक सेल मुळे मुस्लिम महिला नेतृत्व विकासात हातभार लागला आहे.

3) देशातील प्रमुख राजकीय महिला आरक्षणाचे समर्थन करत नाहीत.

4) आर्थिक मागासलेपणा व शिक्षणाच्या अभावामुळे महाराष्ट्र विधिमंडळातील मुस्लिम महिलांचा सहभाग नगण्य/ कमी आहे.

5) विविध राजकीय पक्ष मुस्लिम महिला नेतृत्वाला चढत्या क्रमाने संधी देताना दिसत नाहीत.

संशोधनाचे क्षेत्र व मर्यादा (Research Area and Research Limitations)

प्रस्तुत संशोधनासाठी" महाराष्ट्र विधिमंडळातील मुस्लिम महिला नेतृत्वाचा अभ्यास : (विशेष संदर्भ मराठवाडा)". या विषयाच्या संशोधन समस्येच्या अनुषंगाने अभ्यास करताना मराठवाड्यातील एकूण 8 जिल्हे व 76 तालुके असून यातील विधानसभा व विधान परिषदेतील मतदार संघातील मुस्लिम महिला नेतृत्वाचा अभ्यास केला जाणार आहे. प्रस्तुत संशोधनासाठी काल मर्यादा इसवी सन 2002 ते 2022 ही घेण्यात आली आहे.

संशोधन पद्धती (Research Methode)

संशोधनाचे स्वरूप हे सामाजिक शास्त्र पद्धतीने असल्यामुळे संशोधनात प्राथमिक व दुय्यम माध्यमांचा वापर संशोधन प्रबंधाला दिशा प्राप्त करून देण्यासाठी करण्यात आला आहे. यात ग्रंथालयातील संदर्भ साहित्य पुस्तके, अभ्यास पद्धती, मुलाखत, महाराष्ट्र विधिमंडळातील दस्तऐवज, प्रश्नावली, शासकीय प्रकाशने, संदर्भ ग्रंथ ,वाढदिवसानिमित्त गौरव अंक व विशेष अंक, मासिके, इत्यादी. हे संशोधन गुणात्मक व संख्यात्मक दोन्ही आधारावर असल्यामुळे प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षणात्मक व विश्लेषणात्मक या पद्धतीचे अवलंबन करण्यात येईल.

प्रकरणाची रूपरेषा (Chapter Planning)

प्रस्तुत संशोधन विषयाची मांडणी पैलू लागत घेता ,अभ्यासाकरिता विषयाची मांडणी सहा प्रकरणात केलेली आहे.

प्रकरण पहिले :- प्रस्तावना

प्रस्तुत पहिल्या प्रकरणांमध्ये विषय प्रवेश ,संशोधनाची आवश्यकता, संशोधन समस्या सुत्रण,संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची गृहितके, संशोधनाचे क्षेत्र व मर्यादा, संशोधन पद्धती ,पूर्व साहित्याचा आढावा इत्यादी घटकांची चर्चा करणे.

प्रकरण दुसरे :- मुस्लिम समाजाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

या प्रकरणात भारतात इस्लामचा प्रवेश, मुस्लिम समाजाची सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व आर्थिक स्थिती ,मुस्लिम नेतृत्वाची पार्श्वभूमी, मुस्लिम समाजाची धार्मिक पार्श्वभूमी, मुस्लिम महिलांचे नेतृत्व, इत्यादी . बाबींवर चर्चा करण्यात येईल .

प्रकरण तिसरे :- नेतृत्वाची संकल्पना

सदरील प्रकरणात नेतृत्वाच्या संकल्पनेचा अभ्यास करण्यात येईल. नेतृत्वाचा अर्थ, व्याख्या, नेतृत्वाचे प्रकार, नेतृत्वाचे घटक,नेतृत्वाची जडण-घडण, नेतृत्वाचे विविध पैलू, नेतृत्वाचे गुण-दोष इत्यादी.

प्रकरण चौथे :- मराठवाडा एक दृष्टिक्षेप

प्रस्तुत प्रकरणात मराठवाड्या विषयी माहिती देण्यात आली आहे. मराठवाड्यात एकूण 08 जिल्हे आहेत. व 76 तालुके आहेत. मराठवाड्यातील भौगोलिक स्थिती, सामाजिक स्थिती, राजकीय स्थिती, धार्मिक स्थिती, आर्थिक स्थिती. तसेच मराठवाड्यातील लोकसंख्या इत्यादींचा आढावा या प्रकरणात घेण्यात येईल.

प्रकरण पाचवे :- "महाराष्ट्र विधिमंडळातील मुस्लिम महिला नेतृत्वाचा अभ्यास : (विशेष संदर्भ मराठवाडा)".

प्रस्तुत प्रकरणात मराठवाड्यातील मुस्लिम महिला नेतृत्वाने महाराष्ट्र विधिमंडळात केलेले नेतृत्व, मतदार संघातील विकासात्मक कामे, व भूमिका इत्यादींचे विश्लेषणात्मक अध्ययन करण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे :- सारांश, निष्कर्ष व शिफारशी

प्रस्तुत संशोधन प्रबंधाच्या शेवटच्या प्रकरणांमध्ये अभ्यास विषयांमधून निष्पन्न झालेले निष्कर्ष, गृहीतकृत्यांची पडताळणी आणि त्यावर आधारित महत्वपूर्ण शिफारशी केल्या जाणार आहेत.

संदर्भ सूची

1. प्रो.खेकाळे. ना. रा. (1999), ' राजकीय नेतृत्व' मंगेश प्रकाशन नागपूर.
2. प्रो.जोशी. सुधाकर (2009), ' पाश्चिमात्य राजकीय विचारवंत' विद्या बुक पब्लिशर्स औरंगाबाद.
3. गायकवाड बी. आर .(संपा.) (2012) , 'महाराष्ट्राचा आर्थिक विकास- एक चिंतन ' चिन्मय प्रकाशन ,औरंगाबाद .
4. इंजिनीयर , असगर अली (2012), ' इस्लाम का जन्म और विकास', राजकमल प्रकाशन ,नई दिल्ली.
5. गोपाल, राम (2002), ' भारतीय मुसलमानांचा राजकीय इतिहास-1858ते 1947 ', दुसरी आवृत्ती, मुंबई महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.
6. प्रा.मुजीब (1989) , ' भारतीय मुसलमान', प्रथम आवृत्ती, मुंबई महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई .
7. प्रो. मुक्तार शेख ' राज्य विधिमंडळातील मुस्लिम नेतृत्वाचा अभ्यास'(विशेष संदर्भ औरंगाबाद जिल्हा), (2004ते 2014), हा प्रकाशित पी. एच. डी. संशोधन प्रबंध.
8. प्रो.राजेश मिश्रा 'राजनीति विज्ञान ' (एक समग्र अध्ययन) ,(सातवा संस्करण), ओरियंट ब्लैकस्वान प्रायवेट लिमिटेड .
9. प्रो.व्होरा राजेंद्र / पळशीकर सुहास (2004), ' भारतीय लोकशाही- अर्थ आणि व्यवहार', डायमंड पब्लिकेशन ,पुणे.
10. प्रो.गव्हाणे अजय (2014), ' संसदीय लोकशाहीची आयुधे ', क्रिएटिव्ह पब्लिकेशन ,नांदेड .

विविध आयोग आणि अहवाल

1. मानव विकास अहवाल ,महाराष्ट्र 2002 ,महाराष्ट्र शासन .
2. गोपाल सिंग समिती अहवाल, 1983.
3. सच्चर , न्यायमूर्ती रजिंदर(प्रधानमंत्री उच्चस्तरीय समिती मंत्रिमंडळ सचिवालय, भारत सरकार) , (2006).

4. भारत मे मुसलमानों की सामाजिक ,आर्थिक और शैक्षणिक स्थिती , साईरस ग्राफिक्स नई दिल्ली.
5. रंगनाथ मिश्रा समिती अहवाल, 2007 .
6. डॉ. महमूद- उर -रहमान समिती अहवाल , 2008 .

दैनिके आणि मासिके

1. लोकसत्ता 09 जानेवारी, 2023. ठाणे
2. लोकमत 07 डिसेंबर,2020
3. सकाळ 25 मार्च 2022
4. Economic and political weekly

Website

1. www.eci.in
2. https://www.electionindia.com/ maharashtra

संशोधक

शेख तबसुम मेहबूब

संशोधन केंद्र

पीपल्स महाविद्यालय नांदेड.
जि. नांदेड

मार्गदर्शक

प्रा.डॉ.आय. जी. खान

(राज्यशास्त्र विभाग प्रमुख)

रेणुका देवी महाविद्यालय,
माहूर जि. नांदेड